# एक पुरुषोत्तम

## जयंत नारळीकर

सप्टेंबर १९५८, प्रिन्सेस स्ट्रीट, एडिन्‌बरा. दुपारची वेळ. ब्रिटिश काउन्सिलतर्फे आयोजलेल्या दौऱ्यात मी आणि माझे सहविद्यार्थी शशीकुमार चित्रे एडिन्‌बरा संगीत महोत्सवासाठी केंब्रिजहून आलो होतो. संध्याकाळी कार्यक्रम असायचा, सकाळ एडिन्‌बरा-दर्शनासाठी, तर दुपार मोकळी. आम्ही दोघे प्रिन्सेस स्ट्रीटवर विंडोशॉपिंगचा आनंद लुटत होतो. देशी-विदेशी टूरिस्ट लोकांनी रस्ता गजबजला होता. आम्ही मराठीत त्यांच्यावर टीकाटिप्पणी करत होतो.

''हॅलो! तुम्ही कुठले?''

एकदम मराठीतून विचारलेला प्रश्न ऐकून आम्ही चमकलो. वळून पाहिलं, तर एक भारतीय जोडपं स्मित करीत उभं होतं. ''मी देशपांडे... पु.ल. देशपांडे...'' पुलंनी स्वतःची व नंतर सुनीताताईंची ओळख करून दिली.

नमस्कार-चमत्कार झाल्यावर पु.लं.नी आठवण करून दिली : ''मी काही वर्षांपूर्वी बनारसला तुमच्या घरी आलो होतो. उत्कृष्ट पोह्यांची आठवण आहे.''

मग मला आठवलं... मी शाळेत असताना पु.ल. आमच्या घरी आले होते. नंतर विद्यापीठाच्या संगीत महाविद्यालयात त्यांचं पेटीवादन रंगलं होतं. स्वतः पंडित ओम्‌कारनाथ ठाकुरांनी आपल्या भरघोस भाषेत त्यांचं कौतुक केलं होतं.

आम्ही केंब्रिजमध्ये शिकतो, हे कळल्यावर पु.ल. म्हणाले,

''आम्ही येणार आहोत ते विद्यापीठ पाहायला.''

तेव्हा आम्ही दोघांनी त्यांना केंब्रिजदर्शन घडवण्याची जबाबदारी घेतली.

'अपूर्वाई'च्या वाचकांना 'पी.एल. इन केंब्रिज' पुन्हा सांगण्याची जरूर नाही. पण त्यांच्या केंब्रिज भेटीतली एक हृद्य आठवण सांगावीशी वाटते. सगळीकडे फिरून आल्यावर चित्र्यांच्या खोलीत आम्ही जमलो. तेव्हा पु.ल. म्हणाले,

''मी तुम्हांला एक चिंतन वाचून दाखवतो.''

ते चिंतन पेटीवादनाप्रमाणंच रंगलं. त्यातली पात्रं सजीव झाली आणि त्यांची जवळून ओळख व्हावी असं वाटलं... कारण उत्तर भारतात वाढल्यामुळं मी पु.लं.ना लेखक म्हणून ओळखत नव्हतो. चांगला 'पेटीवादक' चांगला लेखकही असू शकतो, हे माहीत नव्हतं.

पुढं 'बटाट्याची चाळ' केंब्रिजमध्ये अवतरली, तेव्हा चाळकऱ्यांची जवळून ओळख झाली.

विनोदी लिखाणाबद्दल मला विशेष आपुलकी वाटते. इंग्रजीत पी. जी. वुडहाउस आणि डब्ल्यू. डब्ल्यू. जेकब्सचा मी चाहता आहे. मराठीत चिं. वि. जोश्यांच्या चिमणराव-गुंड्याभाऊंनी मला लहानपणापासून भुरळ घातली. त्यांत आता बाबा बर्वे आणि कोचरेकर मास्तरांची भर पडली.

पण उत्कृष्ट विनोदी लिखाण वाचायला जितकं सोपं आणि ते जितक्या सहजगत्या मनोरंजन करतं, तितकं ते लिहायला अवघड असतं... हे विधान खुद्द वुडहाउसनं केलं आहे. वुडहाउसची ओघवती इंग्रजी आपल्याला लिहिता आली असती, तर...? असं कितीतरी इंग्रजी वाचकांना वाटलं असणार... निदान मला तरी वाटतं, आणि तसंच मला वाटतं पु.लं.च्या मराठीबद्दल.

ज्याचं आपल्या विषयावर पूर्ण प्रभुत्व आहे, असा वैज्ञानिक, कठीण विषय श्रोत्याला समजेल, इतका सोपा करून सांगू शकतो. पु.लं.च्या भाषेतून सहजगत्या उमटणारे विनोद अशाच प्रभुत्वाची जाणीव करून देतात.

''तुझे आहे तुजपाशी' आणि 'सुंदर मी होणार' ही नाटकं मी पाहिली, तेव्हा ह्या विनोदी लेखकाच्या प्रतिभेचे आणखी पैलू दिसले. विनोदापासून

गांभीर्यापर्यंत नाट्यतंत्र हाताळण्याची किमया किती साहित्यिकांना जमते? आणि किती नाटककार स्टेजवर प्रभावी भूमिका वठवतात? मी पुलंची अशी एकच भूमिका पाहिली... १९६६ मध्ये 'वाऱ्यावरची वरात'मध्ये. त्या वेळी ती गाजत होती आणि आज चित्रफितीवर पाहायला मिळते. आज सहजगत्या उपलब्ध असलेलं 'व्हिडिओ' माध्यम त्या वेळी प्रचारात असतं, तर पु.लं.चं अभिनयकौशल्य आज कितीतरी वाचकांना प्रत्यक्ष पाहायला मिळालं असतं. अनेक उच्चभ्रू व्यक्ती 'व्हिडिओ'कडे किंचित उपहासानं पाहतात... त्यांनी याची नोंद घ्यावी.

ती 'वाऱ्यावरची वरात' एका वेगळ्या कारणामुळं स्मरणात राहील. १९६५-६६ मध्ये मी प्रसिद्धीच्या झोतात वावरत होतो व माझ्या संकोची स्वभावाला हा अनुभव फारसा मानवत नव्हता. त्यामुळं कुठल्याही जाहीर कार्यक्रमांना मी शक्यतो जात नसे... व गेलोच, तर स्वतःला शक्य तितका प्रच्छन्न ठेवून. पण त्या दिवशी पु.लं.ना माझ्या मामांनी (कै. गो. शं. हुजूरबाजार यांनी) 'अंदर की बात' कळवली की, मी नाटकाला येणार आहे. पु.ल. व सुनीताताईंनी मला श्रोतृवृंदातून शोधून काढलं व कौतुकानं मध्यांतरात स्टेजमागे बोलावलं. मी व माझी वाग्दत्त वधू (मंगला राजवाडे) त्यांना भेटून आलो. आमच्या केंब्रिज-भेटीनंतरची ती पहिलीच भेट... व मला एका आवडत्या साहित्यिकाला (- आणि आता नटालाही!) स्टेजमागे भेटण्याचं थ्रिल अनुभवता आलं. पण मध्यांतरानंतर प्रयोगाआधी पु.लं.नी माइकवर जाहीर केलं, ''आम्हांला अभिमान वाटतो की, जयंतराव नारळीकर आजच्या प्रयोगाला हजर आहेत. मात्र ते कुठं बसलेत, ते सांगत नाही; कारण नाहीतर तुम्ही स्टेजकडे पाहण्याऐवजी त्यांच्याकडेच पाहत बसाल.''

ही घोषणा ऐकून मी कमालीचा अस्वस्थ झालो... कारण चूपचाप येऊन नाटक पाहून जाण्याच्या माझ्या उद्दिष्टाला तडा गेला. पण मंगलानं मार्ग सुचवला :

''तू नाटक संपण्यापूर्वी दहा मिनिटं आधीच हळूच घरी जा, म्हणजे गर्दी तुला नंतर घेरणार नाही.''

मी तसंच केलं. नंतरची वरात टाळण्यासाठी नियोजित वधूला वाऱ्यावर सोडून घरी पळ काढला.

हे सर्व पु.लं.च्या नकळत होईल, अशी मला आशा होती. पण कसचं काय? आमच्या ज्यूडासमामांनी ही वार्तापण पु.लं.च्या कानांवर घातली आणि वर माझी उपस्थिती जाहीर केल्याबद्दल त्यांनाच सुनावलं :

''भाई, तुम्ही लक्ष्मणरेषा ओलांडलीत.''

मी परत भारतात स्थायिक झाल्यावर पु.ल. आणि सुनीताताईंच्या भेटीचे आणि गप्पागोष्टींचे योग आले... पण आज ती संख्या अपुरी वाटते. त्यांच्या नर्मविनोदमय गप्पांचा आनंद वेळोवेळी लुटता आला असता, तर...? पण मुंबईच्या धकाधकीच्या जीवनात ते जमलं नाही. पुण्यात ते अधिक शक्य झालं; आणि महाराष्ट्राचं हे लाडकं व्यक्तिमत्त्व अधिक जवळून पाहता आलं.

पण साहित्य-संगीत-नाट्य आणि गप्पा यांच्यातून दिसणाऱ्या ह्या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचं आगळंच दर्शन वाचकांना घडलं ते 'आहे मनोहरतरी'मधून. इंग्रजीत पत्नीला 'द बेटर हाफ' का म्हणतात, ते ह्या पुस्तकावरून कळतं. पु.लं.ची सर्जनशीलता निर्वेध चालू राहिली, याचं कारण सुनीताताईंनी स्वतःच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला आणि सर्जनशीलतेला बांधं घालून, वेळोवेळी अप्रियता पत्करून त्यांचं केलेलं सारथ्य. ह्या सारथ्यानं केवळ मागे बसलेल्या महारथ्याच्या सांगण्याबरहुकूम रथ चालवला नसून, स्वतःच्या व्यावहारिक दृष्टिकोनातून त्याला वेगळी दिशाही दाखवली आहे आणि काही प्रसंगी त्या महारथ्याला व्यावहारिक गीतादेखील सुनावली आहे.

पु.ल. 'पुरुषोत्तम' झाले, ह्यामागचं एक कारण त्यांना वेळोवेळी 'सुनीत' करणाऱ्या सुनीताताई. दोघांनाही ह्या प्रसंगी सादर अभिवादन!

*('पु.ल. ७५' मधून साभार)*